# दलित-ओबीसींविरोधात

# उच्चजातीय भाकडकथा आणी वास्तवता

**(भाग 1)**

**लेखकः- प्रा. श्रावण देवरे, मोबाईलः 75 88 07 2832**

..........................

1) या लेखाची pdf फाईल मिळविण्यासाठी पुढील लिंकवर क्लीक करा-

https://drive.google.com/file/d/1VeOncP1mPms8WIFRpm-QpSfYwL9sxuCz/view?usp=drive_link

2) Veb Link: https://shrawandeore.com/?p=484

...............................

**(भाग 1)**

**तात्यासाहेब महात्मा फुले यांनी ‘महार’ शब्दाची फोड करतांना सांगीतले की आर्यभटांच्या क्रूर आक्रमणाच्या विरोधात ज्या लोकांनी सर्वात जास्त निकराचा लढा दिला त्या लोकांना आर्यांनी ‘महा-अरि’ म्हणून कुत्सितपणे घोषित केले. महा-अरि म्हणजे मोठा शत्रू ! याच महा-अरि शब्दातून पुढे महार हे जातीवाचक नामकरण झाले.** तात्यासाहेबांनी केलेली महार शब्दाची ही व्याख्या महार सैनिकांनी भिमा-कोरेगाव लढाईत पुन्हा एकदा खरी करून दाखविली आणी आर्यभट पेशव्यांना नाक घासत शरणागती पत्करावी लागली. जातीव्यवस्थेच्या निर्मितीच्या प्रक्रियेत व जातीव्यवस्थेच्या विकासाच्या कालखंडात महार जातीविषयक ज्या भाकडकथा पसरविण्यात आल्या असतील त्यांची आज कुठेही फारशी स्पष्टपणे नोंद नाही, मात्र त्या भाकडकथांचा परिणाम आजही डोळ्यांसमोर स्पष्टपणे दिसत आहे. लढवय्या महार जातीला गावकुसाबाहेर फेकणे व अस्पृश्य म्हणून पिढ्यांपिढ्या वागवणे हे वास्तव अस्तित्वात येण्यामागे या भाकडकथाच कारणीभूत आहेत हे कुणीही नाकारू शकत नाही.

**एखाद्या समाजघटकाला गावकुसाबाहेर फेकणे व अस्पृश्य म्हणून पिढ्यानपिढ्या वागवणे हे एका रात्रीतून वा एका दिवसात घडू शकत नाही.** गावकुसाबाहेर फेकण्यासाठी त्या समाजघटकाची अर्थव्यवस्था दारिद्र्य रेषेखाली आणणे हे काही दिवसात घडवून आणता येउ शकते. आजही गावकुसात राहणाऱ्या काही (सवर्ण?) व्यक्ती दारिद्र्य रेषेखाली आल्यात की त्या आपोआप गावकुसाबाहेरील गावठाणमध्ये वसवलेल्या **'इंदिरा नगर'** मध्ये स्थलांतरीत होतात. आर्थिक-भौतिक परिवर्तनामुळे भारतात गावोगावी अशी 'इंदिरा नगरे' सर्वदूर वसलेली दिसतील. मुंबईसारख्या महानगरातही दक्षिण व मध्य मुंबईत राहणारा मध्यमवर्गीय व उच्च-मध्यमवर्गीय मराठी माणुस मुंबईबाहेरील उपनगरात फेकला गेला. हे स्थलांतर स्वेच्छेने होत असल्याचे दिसत असले तरी, त्यामागे उच्चजातीय-उच्चवर्गीय राज्यकर्त्यांची आर्थिक-राजकीय धोरणेच कारणीभूत असतात आणी ही धोरणे षडयंत्रांचा एक भाग असतात. आर्थिक-भौगोलिक (भौतिक) परिवर्तने हा काही दिवसांचा खेळ असतो. परंतू, जातीव्यवस्थेच्या निर्मितीच्या व जातीव्यवस्थेच्या विकासाच्या काळात अशा गावकुसाबाहेर निर्माण झालेल्या तत्कालीन 'इंदिरा नगरात' राहणाऱ्या महारांसारख्या लढाऊ समाजघटकास पिढ्यान्पिढ्या अस्पृश्य म्हणून वागवणे हा काही दिवसांचा खेळ असू शकत नाही.

**आर्थिक-भौतिक परिवर्तनासोबतच मानसिक परिवर्तन हा सांस्कृतिक परिवर्तनाशी संबंधित असलेला भाग प्रदिर्घ कालावधीतला नियोजनबद्ध व शिस्तबद्ध कार्यक्रम होता.** उदाहरणार्थः उच्चजातीय शासन-प्रसाशनतर्फे एखाद्या समाजघटकाची आर्थिक कोंडी केल्यामुळे अति-दारिद्र्य वाट्याला येणे, अति दारिद्यामुळे गाकुसातील घर विकावे लागणे, गावकुसाबाहेरील गावठाणमध्ये वस्ती करावी लागणे, अति-दारिद्र्यामुळे मेलेल्या जनावरांचे मांस खावे लागणे, फाटके कपडे घालावे लागने, अर्धनग्न राहावे लागणे, दारिद्र्यामुळे मिळतील ती अतिश्रमाची व हीन दर्ज्याची कामे करावी लागणे, सतत श्रमाची कामे व साफसफाईची कामे करावी लागत असल्याने स्वतःच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष्य होणे, गलिच्छ राहणीमान व गलिच्छ आहार यामुळे या समाजघटकास स्पर्श न करण्याची मानसिकता गावकुसातील लोकांच्या मनात निर्माण होत गेली. ती महारांसकट सगळ्यांच्याच

‘अंगवळणी’ पडल्यानंतर या समाजघटकांबद्दल हिन भावना निर्माण करणाऱ्या भाकडकथा रचण्यात आल्यात. उदाहरणार्थः गलिच्छ महाराने मंदिर बाटवले, मेलेल्या जनावरांचे मांस खाणाऱ्याने देव बाटवला, देव कोपला, आता गावावर फार मोठे संकट येईल, दुष्काळ पडेल, हाःहाः कार माजेल वगैरे अफवांच्या भाकडकथा तयार करण्यात आल्यात! त्यातून **स्पर्श-बंदी मंदीर-बंदी, सावली-बंदी, रोटी-बंदी आदि प्रकारातून त्यांची चहु बाजूंनी आर्थिक, सामाजिक, मानसिक कोंडी करण्यात आली. ही कोंडी मजबुत करण्यासाठी भाकड-परंपरा निर्माण करण्यात आल्यात व सर्वात शेवटी हे सर्व ‘मनुस्मृती’ नावाच्या संविधानात अधिकृतपणे कायद्यात रूपांतरित करण्यात आले.**

ही आहे लढवैय्या अस्पृश्यांच्या अधोगतीची सत्यकथा! आता आपण ओबीसींबाबतच्या अधोगतीचा लेखा-जोखा पाहु या!

वर्णव्यवस्थेच्या अंताच्या काळात म्हणजे बौद्ध क्रांतीच्या काळात त्रैवर्णियक गणदासप्रथाक समाजव्यवस्था व चातुर्वर्ण्यक पुरूषसत्ताक शुद्रप्रथाक गणसमाजव्यवस्था नष्ट झाली. दासप्रथा व शूद्रप्रथा नष्ट झाल्यामुळे लाखोंच्या संख्येने दास्यातून मुक्त झालेले शूद्र व गुलाम शेती व शेतीसाठी लागणारी अवजारे बनविण्याची कामे करू लागलेत. शूद्रत्वातुन व गुलामगिरीतून मुक्त झालेल्या दासांना स्वातंत्र्याची मोकळी व स्वच्छ हवा लागल्यामुळे त्यांच्या शरीरात एक नवी उच्चदर्ज्याची उर्जा भरली गेली. शारिरक श्रमाची क्षमता व उत्साह दसपटीने वाढला. **सुप्रसिद्ध इतिहासतज्ञ दा. ध. कोसंबी सांगतात की गुलामगिरीतून मुक्त झालेले हे श्रमिक पहिल्यापेक्षा दसपटीने जास्त उत्पादन करू लागले होते. त्यातून पुग व श्रेणीची आर्थिक-व्यावसायिक भरभराटीची नवी समतावादी समाजव्यवस्था जन्मास आली.** श्रेणी या समाजघटकात एकच व्यवसाय करणारे विविध स्तरावरील समाजघटक संघटित झालेले होते. तर पूग या समाजघटकात विविध व्यवसाय करणारे व्यापारी एकत्रितपणे राहणारे समाजघटक होते. त्यांच्यात आपसात होणारी भांडणे मिटविण्यासाठी पूग व श्रेणींची स्वतंत्र न्यायालये होती व राजा या न्यायालयांच्या न्यायदानात कुठेही हस्तक्षेप करू शकत नव्हता. दसपटीने जास्त

उत्पादित होणाऱ्या या घाउक वस्तूंनी देशातील बाजापेठांसह आंतरराष्ट्रीय बाजारपेठाही काबीज केल्या होत्या.

पुर्वेकडून पश्चिमेकडे गेलेल्या या जागतिकीकरनाने भारतखंडाला भरभराटीच्या व श्रीमंतीच्या शिखरावर नेले होते. बौद्ध सम्राट महानंद राजाच्या संपतीच्या कथा दंतकथा बनल्या होत्या व त्याची नाणी चंद्रगुप्ताच्या नाण्यांपेक्षा श्रेष्ठ दर्ज्याची व अधिक मुल्यवान होती, असे कोसंबी सांगतात. नवी क्रांतीकारक समाजव्यवस्था जन्मास घालणारा हा पुरोगामी समाजघटक मुख्यतः कष्टकरी उत्पादक व सेवाकर्मी समाजघटक होता जो **त्याकाळी पूग व श्रेणी या दोन सन्माननीय नावाखाली संघटित झालेला होता. त्यांच्यात शेतीकाम, सुतारकाम, लोहारकाम, कुंभारकाम, केस-कर्तनकाम, चांभारकाम, गाव-काम, व्यापारकाम, कच्या-पक्क्या मालाची वाहतुक करण्याचे लमाण-काम, दगडाचे पाथरवट-काम, तांब्या-पितळाचे तांबटकाम, रंगारीकाम, मेंढपाळ-काम, भाजीपाल्याचे व फुला-फळांचे माळी-काम, सोन्याचे सुवर्णकाम, धोबीकाम, आदि सेवाकर्मी व उत्पादककर्मी समाजघटक समाविष्ट होते.** ही कामे करणाऱ्या समाजघटकास त्या काळी श्रेष्ठी (अति-प्रतिष्ठीत) मानले जात होते. **या कष्टकरी समाजाचे नामकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात 'ओबीसी' या नावाने केले. तत्कालीन ओबीसींनी बौद्ध क्रांतीचा आर्थिक समतावादी कणा इतका मजबूत केला की, ज्यामुळे बौद्ध धम्म आशियाखंडात पसरला व जागतिक बाजारपेठांवर राज्य करू लागला.**

मोठ-मोठे बौद्ध विहार व बौद्ध-जैन लेण्या निर्माण करण्याचे काम या पुग व श्रेणींतील तत्कालीन श्रेष्ठी ओबीसींनी केले. ही विहारे व लेण्या शिक्षणासाठी विद्यापीठ, व्यापारी माल साठविण्यासाठी गोदाम, आर्थिक व्यवहारासाठी बँका, व्यापारींची विश्राम स्थळे व भिक्खु संघासाठी निवास-स्थाने आदि अनेक उद्देशाने निर्माण करण्यात आलेली होती. जागतिक व्यापारी मार्गांवर ही विहारे व लेण्या निर्माण करण्यात आल्या होत्या. या लेण्यांच्या दगडांवर आजही देणगीदारांची नावे कोरलेली दिसतात. हे सर्व दानशूर कोण होते? अर्थातच उत्पादक-श्रेण्या व व्यापारी-पुग ज्यांना आज "ओबीसी" नावाने ओळखले जाते. **बौद्ध धम्म केवळ धार्मिक**

**क्रांती म्हणून मर्यादित राहीला असता तर बौद्ध विहारात ‘धम्मम सरणम गच्छामी’ रटता-रटता तो ब्राह्मणी-वैदिक धर्माला कधी शरण गेला ते कोणाला कळालेही नसते. इतर धर्मांप्रमाणेच बौद्ध धम्मही लगेच ब्राह्मणवादाला समर्पित झाला असता.** परंतू, तत्कालीन ओबीसी समाजघटकाने या बौद्ध धम्म-क्रांतीचा आर्थिक व सांस्कृतिक कणा मोठ्याप्रमाणात मजबूत केल्यामुळे धम्माला राजाश्रय मिळत गेला. बौद्ध धम्म राजकिय सत्तेचा अधिकृत धर्म बनल्यामुळे ब्राह्मणवाद लाचार बनला व तो उलट्या पावलाने बौद्धवादास शरण आला.

(टीप- हा मुद्दा अधिक विस्ताराने समजून घेण्यासाठी प्रा. श्रावण देवरे यांचे इतर लेख वाचा! लेखांच्या लिंक्स संदर्भ यादीत दिलेल्या आहेत.)

आता आपण लेखाच्या पुढील भागात बौद्ध धम्म-क्रांतीचा मुख्य कणा असलेल्या श्रेष्ठी ओबीसींचे अधःपतन करण्यासाठी कोणती षडयंत्रे व कोणत्या भाकड-कथा रचण्यात आल्यात व त्या सर्वसमाजघटकांनी का व कशा स्वीकारल्यात त्याची चर्चा करू या! तोपर्यंत जयजोती, जयभीम, जय पेरियार!!


**लेखकः**

**प्रा. श्रावण देवरे**

**ओबीसी राजकीय आघाडी**

**Email:** s.deore2012@gmail.com


**संदर्भः**


**1)** संदर्भः ‘Peoples Post’, पाक्षिक, 1-15Nov2023 Article बिहार जात-जनगणना लेख, पान- 16 ते 20

https://acrobat.adobe.com/id/urn:aaid:sc:AP:183ec38c-3d41-401a-8fe7-0096b25e31f1

**2)** पाक्षिकातील या लेखाची pdf कॉपी पुढीलप्रमाणे Link:

https://drive.google.com/file/d/1FhoDNnJB8SgPL5AXH6YR7_Fe0NRPW1OO/view?usp=drive_link

**3)** प्रा. श्रावण देवरे यांची 'साप्ताहिक रयत' ने घेतलेली मुलाखत भाग-3 ची लिंक पुढीलप्रमाणे- ''जात-निर्मिती व जातीअंत''

https://drive.google.com/file/d/1PqkVyzOxloVIAW1E0YOz9cSnhs-jNEwn/view?usp=drive_link

**4)** प्रा. श्रावण देवरे यांची 'साप्ताहिक रयत' ने घेतलेली मुलाखत भाग-4 ची लिंक पुढीलप्रमाणे- ''जात-निर्मिती व जातीअंत''

https://drive.google.com/file/d/1erJyoLSnUxCWdGmMLpU0xf9GNTuwCwNV/view?usp=drive_link

**5)** हा लेख दैनिक ''बहुजन सौरभ'' च्या 22 ऑक्टोंबर 2026 च्या अंकात प्रकाशित झाला आहे.

# दलित-ओबीसींबाबतच्या उच्चजातीय भाकडकथा आणि वास्तवता



तात्यासाहेब महात्मा फुले यांनी 'महार' शब्दाची फोड करताना सांगितले की, आर्यांच्या क्रूर आक्रमणाविरुद्ध ज्यांनी सर्वाधिक निकराचा लढा दिला, त्यांना आर्यांनी 'महा-अरि' म्हणजेच मोठा शत्रू म्हणून कुत्सितपणे संबोधले. याच शब्दातून पुढे 'महार' हे जातिवाचक नामकरण झाले, अशी त्यांची मांडणी होती. भीमा-कोरेगावच्या लढाईत महार सैनिकांनी दाखविलेल्या शौर्याचा उल्लेख करताना या लढाऊ परंपरेची आठवण करून दिली जाते. महार समाजाला गावकुसाबाहेर ठेवणे आणि अस्पृश्यतेची वागणूक देणे, या ऐतिहासिक वास्तवामागे सामाजिक बहिष्काराला समर्थन देणाऱ्या समजुती आणि कथांची भूमिका महत्त्वाची होती. एखाद्या समाजघटकाला पिढ्यानपिढ्या अस्पृश्य ठरविणे ही एका दिवसात घडणारी प्रक्रिया नाही. त्यासाठी आर्थिक, सामाजिक आणि मानसिक पातळ्यांवर दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आवश्यक असते. एखाद्या समाजाची आर्थिक परिस्थिती खालावल्यास त्याला राहते घर विकावे लागू शकते आणि गावाबाहेर वस्ती करावी लागू शकते. आजही दारिद्र्यामुळे काही कुटुंबे गावातील मुख्य वस्तीपासून दूर असलेल्या वस्त्यांमध्ये राहतात. मात्र, आर्थिक परिस्थितीतील बदल आणि एखाद्या समाजाला पिढ्यानपिढ्या अस्पृश्य मानणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अस्पृश्यतेसारखी व्यवस्था टिकून राहण्यासाठी आर्थिक शोषणाबरोबरच मानसिक आणि सांस्कृतिक पातळीवरील भेदभावही रुजविला गेला. दारिद्र्यामुळे काही समाजघटकांना मेलेल्या जनावरांचे मांस खावे लागले, फाटके कपडे वापरावे लागले आणि अतिश्रमाची, कमी प्रतिष्ठेची समजली जाणारी कामे करावी लागली. सतत श्रमाची आणि साफसफाईची कामे करताना स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या राहणीमानावरही परिणाम झाला. या परिस्थितीचा विचार करण्याऐवजी समाजाने त्यांनाच हीन समजण्यास सुरुवात केली. यातूनच अस्पृश्य समाजाने मंदिर बाटवले, देव अपवित्र केला किंवा त्याच्या स्पर्शामुळे गावावर संकट येईल, अशा प्रकारच्या भाकडकथा आणि अंधश्रद्धा पसरविल्या गेल्या, असा लेखकाचा युक्तिवाद आहे. अशा समजुतींच्या आधारे स्पर्शबंदी, मंदिरबंदी, सावलीबंदी आणि रोटीबंदी यांसारखे भेदभाव टिकवून ठेवण्यात आले. परिणामी, संबंधित समाजघटकांची आर्थिक, सामाजिक आणि मानसिक कोंडी झाली. या भेदभावाला धार्मिक-सामाजिक परंपरांचे समर्थन मिळाले आणि मनुस्मृतीसारख्या ग्रंथांतील जातीय नियमांनी त्याला वैचारिक आधार दिला. अशाप्रकारे लढाऊ आणि कष्टकरी समाजघटकाला सामाजिकदृष्ट्या कनिष्ठ ठरविण्याची प्रक्रिया विकसित झाली.



प्रा. श्रावण देवरे
मो. 9422788546

ओबीसी समाजाची ऐतिहासिक भूमिका आता ओबीसी समाजाच्या अधोगतीचा विचार करूया. लेखकाच्या मांडणीनुसार, बौद्ध क्रांतीच्या काळात वर्णव्यवस्थेतील दासप्रथेला धक्का बसला. दास्यातून मुक्त झालेल्या अनेक लोकांनी शेती आणि शेतीसाठी आवश्यक अवजारे बनविण्याची कामे स्वीकारली. त्यातून उत्पादन आणि व्यवसायावर आधारित 'पूग' आणि 'श्रेणी' या संघटनांचा विकास झाला. या संघटनांमध्ये शेतकरी, सुतार, लोहार, कुंभार, चांभार, न्हावी, धोबी, माळी, सोनार, तांबट, रंगारी, मेंढपाळ, पाथरवट आणि व्यापारी यांसारखे उत्पादक व सेवाकर्मी समाजघटक सहभागी होते. मालाची वाहतूक करणारे लमाण आणि गावाच्या विविध गरजा पूर्ण करणारे कारागीरही या आर्थिक व्यवस्थेचा भाग होते. समाजाच्या दैनंदिन गरजा भागविणाऱ्या या घटकांना तत्कालीन अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान होते. लेखक या ऐतिहासिक उत्पादक आणि सेवाकर्मी समाजघटकांचा संबंध आजच्या ओबीसी समाजाशी जोडतात. या समाजघटकांनी शेती, हस्तकला, व्यापार आणि विविध सेवा यांच्या माध्यमातून आर्थिक समृद्धी निर्माण केली. बौद्ध धम्माच्या प्रसारासाठी आवश्यक असलेल्या विहारांच्या आणि लेण्यांच्या निर्मितीतही व्यापारी, कारागीर आणि दानशूर व्यक्तींनी योगदान दिले. अनेक बौद्ध लेण्यांतील शिलालेखांमध्ये दान देणाऱ्या व्यक्तींची नावे आढळतात. या दानातून तत्कालीन समाजातील आर्थिक व्यवहार, व्यापार आणि धार्मिक-सांस्कृतिक कार्य यांचा परस्पर संबंध स्पष्ट होतो. बौद्ध विहारे केवळ धार्मिक उपासनेची ठिकाणे नव्हती. ती शिक्षण, भिक्खूंचे निवास, व्यापाऱ्यांची विश्रांती आणि काही ठिकाणी व्यापाराशी संबंधित व्यवहार यांसाठीही उपयुक्त ठरत होती. व्यापारी मार्गांवरील विहारे आणि लेण्यांनी बौद्ध धम्माच्या प्रसाराला मदत केली. लेखकाच्या मते, उत्पादक आणि व्यापारी समाजघटकांच्या आर्थिक पाठबळामुळे बौद्ध धम्माचा सामाजिक व सांस्कृतिक पाया मजबूत झाला. बौद्ध धम्माचा प्रभाव केवळ धार्मिक विचारांपुरता मर्यादित नव्हता. समता, श्रमाचे महत्त्व आणि संघटित सामाजिक जीवन यांना प्रोत्साहन देणाऱ्या प्रवाहांमुळे तत्कालीन आर्थिक-सामाजिक व्यवस्थेत बदल घडले. या परिवर्तनामध्ये उत्पादक आणि सेवाकर्मी समाजघटकांचा वाटा महत्त्वाचा होता. त्यांच्याकडून मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे विहारे, लेणी आणि शिक्षणाची केंद्रे उभारण्यास हातभार लागला. लेखकाच्या मते, बौद्ध धम्माला मिळालेल्या आर्थिक आणि सांस्कृतिक पाठबळामुळे त्याचा प्रसार व्यापक झाला आणि त्याला राजाश्रयही मिळाला. त्यामुळे ब्राह्मणवादी व्यवस्थेला आव्हान निर्माण झाले. पुढील काळात बौद्ध धम्माचा प्रभाव कमी होण्याची आणि जातिव्यवस्था पुन्हा बळकट होण्याची प्रक्रिया समजून घेताना या उत्पादक समाजघटकांच्या ऐतिहासिक भूमिकेचा विचार करणे आवश्यक आहे. पुढील भागात बौद्ध धम्मक्रांतीचा आर्थिक कणा मानल्या गेलेल्या श्रेष्ठी ओबीसी समाजाचे अधःपतन करण्यासाठी कोणती षड्यंत्रे आणि भाकडकथा रचण्यात आल्या, तसेच त्या समाजात कशा स्वीकारल्या गेल्या, याची चर्चा करण्यात येईल. ●●